

# अर्थशास्त्र लेख-४

**सदाशिव पाटील,** *शाळा :* बालमोहन विद्यामंदिर, दादर

**प्रकरण : ५) सार्वजनिक वितरण प्रणाली.**
**६) नवीन आर्थिक धोरण.**

विद्यार्थी मित्रांनो,

सार्वजनिक वितरण प्रणाली हा सरकारच्या अन्न व्यवस्थापन धोरणाचा अनिवार्य घटक आहे. या वितरण प्रणालीची जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारांची असते. उपभोक्त्यांना स्वस्त आणि सवलतीच्या दरात जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे हे सार्वजनिक वितरण प्रणालीचे मूलभूत उद्दिष्ट आहे. यामध्ये तांदूळ, गहू, साखर, केरोसिन, कापड आणि खाद्यतेल या वस्तू अंतर्भूत आहेत. सदर पाठात सार्वजनिक वितरण प्रणालीची प्रगती, त्यामधील उणिवा व त्या दूर करण्याचे उपाय या प्रमुख बाबींचा अभ्यास करणार आहोत.

उदारीकरण, जागतिकीकरण व खासगीकरण ही तीन प्रमुख उद्दिष्टे समोर ठेवून सरकारने २४ जुलै १९९१ रोजी संसदेला नवीन आर्थिक धोरण सादर केले. या धोरणाचे काही अनुकूल तर काही प्रतिकूल परिणाम झाले. उद्योग व व्यावसायिक संस्थांवरील निर्बंध काढून त्यांना त्यांच्या व्यावहारिक उलाढालीत पूर्ण स्वातंत्र्य देणे म्हणजे 'उदारीकरण' होय. देशाच्या भौगोलिक सीमाक्षेत्राबाहेर होणारा आर्थिक क्रियांचा विकास आणि विस्तार म्हणजे 'जागतिकीकरण' होय. तर खासगीकरण ही एक अशी प्रक्रिया की ज्याद्वारे खासगी क्षेत्रातील उत्पादकांना सार्वजनिक क्षेत्राच्या मालकीत किंवा व्यवस्थापनात सहभागी होता येते.

या दोन्ही प्रकरणांशी संबंधित काही महत्त्वाची प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे :

**प्रश्न : दिलेल्या पर्यायामधून योग्य तो पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) कुटुंबांना शिधावाटप पत्रिकेचे वितरण ------ पत्त्याच्या आधारे केले जाते.
(राज्याच्या, वास्तव्याच्या, जिल्ह्याच्या)

२) ------ टक्के स्वस्त धान दुकाने ग्रामीण भागात आहेत.
(५०, ७५, ६०)

३) सार्वजनिक क्षेत्राचे खासगी क्षेत्रात रूपांतर करण्याला ------ म्हणतात.
(खासगीकरण, राष्ट्रीयीकरण, उदारीकरण)

४) उदारीकरणामध्ये ------ ला कमी महत्त्व दिले आहे.
(औद्योगिक धोरण, परवाना धोरण, आयात-निर्यात धोरण)

**उत्तर** : १) वास्तव्याच्या, २) ७५, ३) खासगीकरण, ४) परवाना धोरण.

**प्रश्न : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एक ते दोन वाक्यांत लिहा :**

१) सार्वजनिक वितरण प्रणालीचे मूलभूत उद्दिष्ट कोणते आहे?

**उत्तर** : सार्वजनिक वितरण प्रणालीचे मूलभूत उद्दिष्ट म्हणजे उपभोक्त्यांना स्वस्त आणि सवलतीच्या दरात जीवनाश्यक वस्तूंचा पुरवठा करणे होय.

२) कमी दरातील शिधावाटप प्रणालीचा फायदा कोणाला झाला नाही?

**उत्तर** : बेघर, गरीब आणि निवासाचे पत्ते नसलेल्या व्यक्तींना कमी दरातील शिधावाटप प्रणालीचा फायदा झाला नाही.

३) उदारीकरणाचा भारतीय उत्पादनाच्या दर्जावर कोणता परिणाम झाला?

**उत्तर :** उदारीकरणाद्वारे मुक्त आयातीमुळे परकीय उत्पादकांबरोबर स्पर्धा निर्माण झाली. त्यामुळे देशी व विदेशी बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी भारतीय उत्पादनाचा दर्जा सुधारणे आवश्यक झाले.

४) खासगीकरणाचे दोन अर्थ कोणते?

**उत्तर :** संकुचित अर्थाने खासगीकरण म्हणजे सार्वजनिक मालकीऐवजी खासगी मालकी प्रस्थापित करणे, तर विस्तृत अर्थाने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे व्यवस्थापन व नियंत्रण खासगी क्षेत्राकडे घेणे होय.

५) आयात पर्यायीकरणामुळे देशाला कोणत्या बाबतीत स्वयंनिर्भरता प्राप्त झाली?

**उत्तर :** आयात पर्यायीकरणामुळे देशाला प्रामुख्याने अन्नधान्य, भांडवली उपकरण, विज्ञान व तंत्रज्ञान, भांडवल निर्मिती इत्यादींमध्ये स्वयंनिर्भरता प्राप्त झाली.

**प्रश्न : संकल्पना स्पष्ट करा.**

● **जागतिकीकरण** : देशाच्या सीमाक्षेत्राबाहेर होणारा आर्थिक व्यवहारांचा विकास आणि विस्तार म्हणजे जागतिकीकरण होय. या प्रक्रियेने देशाच्या सीमा क्षेत्राबाहेर भांडवल, वस्तू, उद्योजक, व्यावसायिक व कामगार यांचा मुक्तसंचार सुरू होतो. आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाहाचा विस्तार व तंत्रज्ञानाचा जलदगतीने प्रसार होतो. जागतिकीकरणात उत्पादनाचे आणि बाजारपेठेचे जागतिकीकरण होत असते.

● **लक्ष्याधारित सार्वजनिक वितरण प्रणाली** : या वितरण प्रणालीअंतर्गत दुहेरी किंमत रचना १९९७ मध्ये सुरू केली. त्यानुसार दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी बाजारातील किमतीच्या ५० टक्के किमतीने म्हणजेच सवलतीच्या दराने आणि दारिद्र्यरेषेच्या वरील कुटुंबासाठी सार्वजनिक वितरण प्रणालीच्या किमती बाजार किमतीच्या जवळपास ठरविण्यात आल्या. त्यामुळे धान्य खरेदी करण्याचे प्रलोभन नसल्याने अशा कुटुंबाकडून खरेदीचे प्रमाण कमी झाले. सरकारकडील अन्नधान्याच्या साठ्यात वाढ झाली. ही समस्या सोडविण्यासाठी जुलै २००१ पासून दारिद्र्यरेषेवरील कुटुंबासाठी सार्वजनिक वितरण प्रणालीच्या किमती ३० टक्क्यांनी कमी केल्या.

**प्रश्न : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी पाच ते सहा वाक्यांत लिहा :**

**१) सार्वजनिक वितरण प्रणालीतील उणिवा स्पष्ट करा.**

**उत्तर** : सार्वजनिक वितरण प्रणालीतील उणिवा पुढीलप्रमाणे आहेत :

● **गरिबांना मर्यादित फायदा :** केवळ २० टक्के गरिबांनाच लाभ घेता आला. कारण बहुसंख्य गरीब कुटुंबाकडे पंजीकृत निवासाचे पत्ते नव्हते, त्यामुळे त्यांना सार्वजनिक वितरण प्रणालीच्या बाहेर ठेवण्यात आले.

● **प्रादेशिक विषमता** : या प्रणाली अंतर्गत प्रादेशिक विषमता दिसून आली. काही राज्यांमध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्याचे वाटा जास्त असताना प्रत्यक्ष अन्नधान्याची उचल कमी झाली तर दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या कमी असताना ही उचल जास्त झाल्याचे आढळून आले.

● **शहरी पूर्वग्रह** : ७५ टक्के स्वस्त धान्य दुकाने ग्रामीण भागात आहेत. परंतु त्यांची वाटप प्रणाली निम्न प्रतीची होती, तसेच अन्नधान्य योग्य त्या प्रमाणात उपलब्ध नसल्याचे आढळून आले. शहरी भागात मात्र अन्नधान्य उचलीचे प्रमाण जास्त होते.

● **अकार्यक्षम भारतीय अन्न महामंडळ** : अन्न महामंडळाच्या अकार्यक्षमपणामुळे या महामंडळाचा आर्थिक खर्च वाढत आहे. गहू आणि तांदळाचे वाढीव उत्पन्न फारच कमी राज्यात केंद्रित झाले आहे.

**२) खासगीकरणाच्या बाजूने युक्तीवाद स्पष्ट करा :**

**उत्तर** : खासगीकरण म्हणजे सार्वजनिक मालकीच्या उद्योग संस्थांची अंशत: किंवा पूर्णता विक्री खासगी क्षेत्राला करणे होय, यामध्ये कंत्राटदार पद्धती आणि व्यवस्थापनाचे खासगीकरण यांचा समावेश होतो. खासगीकरणाच्या समर्थनार्थ पुढीलप्रमाणे युक्तीवाद करता येईल :

● खासगीकरणामुळे उद्योग व व्यवसायाची कार्यक्षमता व कामगिरीत सुधारणा होते.

● उद्योग, व्यवसायातील उणिवांची दुरुस्ती होऊन ग्राहकांना तत्पर सेवा उपलब्ध होतात.

● खासगी क्षेत्रामुळे आर्थिक क्षेत्रातील राजकीय हस्तक्षेपास आळा बसतो, नियोजन यशस्वी होते.

● भांडवल बाजारात शिस्तीचे पालन होते.

● खासगीकरणामुळे जबाबदारीचे निश्चितीकरण सुलभ होते.

**३) बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भारतातील प्रवेशामुळे भारतीय उद्योगावर होणारे विपरित परिणाम कोणते?**

**उत्तर** : जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भारतीय उद्योग व बहुराष्ट्रीय कंपन्या यामध्ये असमान स्पर्धा निर्माण झाली आहे. भारतीय उद्योगांवर अशा बहुराष्ट्रीय कंपन्या पुढीलप्रमाणे विपरित परिणाम करतात :

● भारतीय उद्योगांच्या लहान आकारमानामुळे तुलनात्मकदृष्ट्या तोटा होतो.

● भारतातील व्यावसायिक संस्थांच्या भांडवलाचा खर्च बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या खर्चापेक्षा जास्त आहे.

● बहुराष्ट्रीय कंपन्यांची आर्थिक स्थिती सक्षम आहे.

● बहुराष्ट्रीय कंपन्यांनी सुरू केलेले नवीन उद्योग आधुनिक तंत्रज्ञानाच्या व कमी श्रमाच्या वापराचे आहेत.

● भारत सरकारचे धोरण बहुराष्ट्रीय कंपन्यांना अनकूल आहे. कारण लघुउद्योगांसाठी राखीव क्षेत्रातील उत्पादनाची आयात करण्यात भारत सरकार बहुराष्ट्रीय कंपन्यांना परवानगी देते, परंतु देशातील उद्योगांना अशी परवानगी देत नाही.

**टीप :** अर्थशास्त्र हा केवळ पाठांतराचा विषय नाही. पाठ्यपुस्तकातील प्रत्येक प्रकरणाचे दोन-तीन वेळा बारकाईने वाचन करा. वाचनानंतर मनन करा. महत्त्वाचे मुद्दे स्मरण करून आठवलेली माहिती आकर्षकपणे लिहिण्याचा प्रयत्न करा.

**उद्याचा विषय : विज्ञान II**

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com

लोकसत्ता यशस्वी भव!
दहावी अभ्यास मालिका